# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक १५

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **बुधवार दिनांक २३/०४/२०२५ सकाळी ११-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ३. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ४. | श्री.किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ५. | श्री. बाळासाहेब तटटू | मुख्य लेखाअधिकारी |
| ६. | श्री. शाहेद मो. युसुफ शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ७. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्य लेखापरीक्षक |
| ८. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्यकारी अभियंता, स्थापत्य |
| ९. | श्री नवनित सोनवणे | कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा |
| १०. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ११. | डॉ.संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| १२. | श्री स्वप्नील गंडम | सहा. नगररचनाकार |
| १३. | श्री. प्रकाश सोनवणे | उपअभियंता नगररचना विभाग |
| १४. | श्री कमलेश सोनवणे | सहा.अभियंता |
| १५. | श्री.संजय मोरे | अधिक्षक,आस्थापना विभाग |
| १६. | श्री चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १७. | श्री. पी.डी. चव्हाण | उप अभियंता, बांधकाम विभाग |
| १८. | श्री. एन. के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १९. | श्री हेमंत पावटे | कनिष्ठ अभियंता, बांधकाम |
| २०. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २१. | श्री अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २२. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| २३. | श्री लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २४. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |
| २५. | श्री संभाजी सुडके | शिक्षण मंडळ |
| २६. | श्री.मधूकर निकुंभे | मालमत्ता अधिक्षक |
| २७. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| २८. | श्री गणेश खोंडे | प्रकल्प अधिकारी |

मा.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** — आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

मा.नगरसचिव — जम्मू काश्मिर मधील पहलगाम येथे झालेल्या भिषण दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचे दु:खद निधन झाले आहे. यात देशभरातील विविध राज्यातील तर काही विदेशी नागरीकांचा समावेश आहे. अशा या भ्याड हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांना भावपूर्ण श्रध्दांजली.

विषय क्रमांक:-१४१ मागील प्रशासकीय महासभांचे क्र.११, १२, १३(बजेट) अनुक्रमे दि. ३१/०१/२०२५, दि.२०/०२/२०२५, दि.०७/०३/२०२५ सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४१ दिनांक २३/०४/२०२५**

मागील प्रशासकीय महासभा क्रमांक ११ दिनांक ३१/०१/२०२५च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक ११३ ते १२३ अखेर क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच मागील प्रशासकीय महासभा क्रमांक १२ दिनांक २०/०२/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १२४ ते १३२ व प्रशासकीय महासभा क्रमांक १३(बजेट) दिनांक ०७/०३/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १३३ अखेर वाचून कायम करणेस करणेस वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१४२ धुळे महानगरपालिका वाढीव हद्दीतील क्षेत्राची प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सहा. नगररचनाकार आपली प्रारुप विकास योजना दि.५/०१/२०१८ हददवाढ मंजुर झाली होती. त्यानंतर दि.१/०९/२०२२ रोजी ठराव घेतला. त्यानंतर दि.१३/१०/२०२२ गॅझेटमध्ये प्रसिध्द केली. त्यानंतर विद्यमान वापर नकाशा तयार केला तो हस्तांतरीत केला होता. दि.५/४/२०२३ रोजी त्यानंतर प्रारुप विकास योजनेचा प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार करण्यात आला आहे. यात आपण सेक्टरवाईझ प्लॅनिंग न करता गाव निहाय प्लॅनिंग केले आहे. त्यानंतर लोकसंख्या प्रक्षेपण विचारात घेतले आहे. आरक्षणासाठी २ लाख २६ हजार लोकसंख्या प्रक्षेपित मंजुर करुन घेतली आहे आणि सन २०४७ पर्यंत झोनिंगकरीता २ लाख ४८ हजार ही लोकसंख्या आपण सहा. संचालक नगररचना नाशिक यांच्याकडुन मंजुर करुन घेतली आहे. प्रारुप योजना मुदतवाढीची मुळ मुदत दि.१५/०३/२०२५ पर्यंत होती. त्याअनुषंगाने दि.१५/३/२०२५ पर्यंत प्रारुप विकास योजना प्रसिध्द करणे आवश्यक होते. परंतु ती आचारसंहिता कालावधी असल्याने प्रसिध्द करण्यात आलेली नाही. २ महिने मुदतवाढ करणेचे प्रस्तावित करतोय. दरम्यान आपण ठराव घेणे गरजेचे असते. प्रारुप विकास योजना प्रसिदध् करणेबाबत ठराव मंजुर करणे गरजेचे आहे. तसेच मे. स्थायी समितीने ३ सदस्य नियोजन समितीमध्ये कलम २५ अन्वये ज्या हरकती सुचना येतात प्रसिध्दीनंतर त्यावर नियोजन समितीने निर्णय घेणे आवश्यक असते. त्याकरीता नियोजन समितीमध्ये स्थायी समितीचे ३ सदस्य असतात. हे संचालक नगररचना हे नियुक्त करतात. परंतु बॉडी अस्तित्वात नसल्याने मा. आयुक्त सो यांना अधिकार प्राप्त आहे. मुदतवाढ मंजुर करण्यास हरकत नसावी. तसेच ठराव मंजुर करुन राजपत्रात प्रसिध्द करुन तसेच दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावे.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता हि मुदतवाढ दि.१६/३/२०२५ पासुन देणार आहोत. त्याचा अजुन पिरिएड ठेवावा. कारण पुढील विषय देखील प्रसिध्द करण्यासंदर्भातलाच आहे. प्रसिध्द करण्याला मान्यता दिली की तो प्रसिध्द होईल म्हणजे १५ मेच्या आत ही प्रोसिजर संपेल. आज ठराव झाला की तुम्ही लगेच प्रसिध्द करु शकतात म्हणजे यापेक्षा जास्त कालावधी गरजेचा नाही. याचे शेडयुल कसे राहिल.

म.सहा.नगररचनाकार आता ठराव झाला की गॅझेट प्रसिध्दीसाठी पाठवुन देवु. गॅझेट प्रसिध्द झाल्यावर आणि वृत्तपत्रात प्रसिध्दीसाठी पाठवु. मग नकाशे डिसप्ले करु. नकाशे डिसप्ले झाल्यानंतर १ महिन्याचा कालावधी हरकतीसाठी देतो. हरकती, सुचना ज्या प्राप्त होतील नियोजन समितीची प्रोसिजर करुन घेतो. त्यानंतर नियोजन समितीने त्यावर निर्णय घ्यायचा असतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४२ दिनांक २३/०४/२०२५**

धुळे महानगरपालिका वाढीव हद्दीतील क्षेत्राची प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी धुळे महानगरपालिकेने दि.२१.११.२०२२ रोजीच्या संदर्भीय आदेशान्वये सहायक संचालक, नगर रचना, धुळे शाखा, धुळे यांची "नगर रचना अधिकारी"म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यानुषंगाने "नगररचना अधिकारी"यांनी अस्तित्वातील जमीन वापर नकाशा दि.०५.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये धुळे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेला असून, प्रारूप विकास योजना तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

धुळे महानगरपालिका वाढीव हद्दीतील क्षेत्राची प्रारुप विकास योजना तयार करण्याचा इरादा दि.१३.१०.२०२२ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झालेला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम"असे संबोधिलेले आहे) मधील तरतूदी नुसार प्रारूप विकास योजना कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करण्याची मुळ मुदत, इरादा महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, दोन वर्ष म्हणजेच दि.१२.१०.२०२४पर्यंत आहे. परंतु, उक्त अधिनियानाचे कलम १४८अ मधील तरतुदीनुसार निवडणूक आचारसंहीतेचा कालावधी वगळण्याची तरतूद आहे.

लोकसभा, पदवीधर मतदार संघ तसेच विधानसभा निवडणूक आचारसंहीतेचा कालावधी एकूण १५४ दिवस. त्यानुसार उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रारूप विकास योजना प्रसिद्धीची सुधारीत मुदत दि.१५.०३.२०२५ अशी आहे.

तथापी, सद्यस्थितीत उक्त मूळ मुदत संपुष्टात आलेली असल्याने अधिनियमातील कलम २६(१)मधील तरतूदीनुसार प्रारूप विकास योजनेचे उर्वरित काम करण्यासाठी सुमारे ०२ महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे उक्त कालावधी विचारात घेता दि.१६.०३.२०२५ ते दि.१५.०५.२०२५ या कालावधीचा मुदतवाढीचा प्रस्ताव, मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे असे कळविलेले आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगराचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) मधील तरतुदीनुसार दिनांक दि.१६.०३.२०२५ ते दि.१५.०५.२०२५पर्यंत उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अनुसार प्रारूप विकास योजना प्रसिद्ध करण्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये आणि अन्य विहित मार्गाने प्रसिद्ध करण्याकरिता मुदतवाढ देणेची बाब हि धोरणात्मक असल्याने धोरणात्मक निर्णयासाठी सदर विषय महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता धुळे महानगरपालिका वाढीव हद्दीतील क्षेत्राची प्रारुप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम

२६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी दिनांक १६/०३/२०२५ ते १५/०५/२०२५ पावेतो मुदतवाढ देण्यास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१४३ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये वाढीव हद्दीच प्रारुप विकास योजना आराखडा हस्तांतरीत करुन प्रसिध्द करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. विषय क्रमांक १४३ ही त्याच स्वरुपाचा विषय आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४३ दिनांक २३/०४/२०२५**

धुळे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १२१, दि. ०१.०९.२०२२ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे “उक्त अधिनियम” असे संबोधिलेले आहे) चे कलम २१(२) च्या अनुषंगाने कलम २३(१) अन्वये धुळे महानगरपलिकेच्या वाढीव हद्दीतील क्षेत्राची प्रारुप विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहीर करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार धुळे महानगरपालिकेने इराद्याबाबतची सूचना दि. १३.१०.२०२२ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या नाशिक विभागीय पुरवणी, भाग - १ मध्ये पृष्ठ क्र. २७ व २८ वर प्रसिध्द केली आहे.

उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याची मुदत दि. १२.०४.२०२३ पर्यंत होती. नगर रचना अधिकारी यांनी धुळे महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील क्षेत्राचे सर्व्हेक्षण करून, सदरच्या मुदतीमध्ये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करून पत्र क्र. नरवियोविघ - धुळे मनपा/ हस्तांतरण/ कलम-२५/ २६, दि. ०५.०४.२०२३ अन्वये अहवालासह विद्यमान जमीन वापर नकाशा धुळे महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेला आहे. आता, या कार्यालयाने धुळे महानगरपलिकेच्या वाढीव हद्दीतील क्षेत्राची प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमातील विकास योजना संबंधीच्या सर्व तरतुदींचे पालन करुन तयार केली असून, ती उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करणेस्तव प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे

उक्त प्रस्ताव विचारात घेता, प्रस्तावातील नमूद १ ते ७ मुद्दे विचारात घेवून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 कलम 26 अन्वये वाढीव हद्दीचा प्रारूप विकास योजना आराखडा प्रसिध्द करणेसाठी नागरिकांच्या तसेच लोकप्रतिनिधींच्या सूचना तथा दुरुस्ती/ सुधारणांचा समावेश करुन पुनश्च प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर करण्यास मान्यतावाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१४४ धुळे महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.5 मध्ये आनंद नगर ओपन स्पेस येथे स्वखर्चातून मेडीटेशन सेंटर (ध्यान केंद्र) उभारण्यास परवानगी देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता वलवाडी सर्वे नं. १५/२ मधील ही ओपनस्पेस जागा आहे. स्वखर्चाने ध्यान केंद्र उभारणेसंदर्भात आपल्याकडे प्रस्ताव आला आहे. ग्राऊंड फलोअरला १० टक्के व त्याच्यावर ५ टक्के असे एकुण १५ टक्के जागेत बांधकाम करता येईल असे नगररचना विभागाने अभिप्राय दिला आहे. तसेच दोन स्थानिक वृत्तपत्रात हरकती, सुचना मागविल्या होत्या त्यात एकही हरकत प्राप्त झालेली नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक कोणत्या संस्थेला दिले आहे हे.

मा.उपअभियंता हे बांधकाम बोरसे ब्रदर्स या संस्थेस दिले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे अलाऊड आहे का अशा स्वरुपाचे बांधकाम करणे.

उपअभियंता हो करु शकतो. कॉलनी परिसरातील नागरीकांची तशी मागणी आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक कॉलनी परिसरातील नागरीकांनी संमतीपत्र दिले आहे का.

मा.उपअभियंता माजी नगरसेविका यांनी तसे पत्र दिले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक लेआऊटमधील ती जी सोसायटी असेल त्यांचे सदस्यांचे पत्र देणे आवश्यक आहे. फक्त माजी नगरसेवकांच्या पत्राच्या आधारावर हे होऊ शकत नाही. त्यांच्या सोसायटीच्या संचालकांचा ठराव लागेल. भविष्यात अडचणी निर्माण होवु शकतात. तेथे राहणाऱ्या नागरीकांचा अभिप्राय महत्वाचा आहे. यामध्ये त्यांचे अभिप्राय येईपर्यंत विषय तहकुब ठेवण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४४ दिनांक २३/०४/२०२५**

धुळे मनपा हद्दीतील आनंद नगर भागातील बंदिस्त ओपन प्लेस (नालंदा शाळे समोर) येथे स्व:खर्चातून मेडिटेशन सेंटर (ध्यान केंद्र) उभारावायचे आहे त्या सोबत जॉगिंग ट्रॅक,लाईट सुविधा बसण्यासाठी बाग व निगा राखण्यासाठी वॉचमनची देखील सुविधा करण्यात येणार आहे. सदर परिसरातील सुख सुविधा या खाजगी तत्वावर स्वखर्चाने सुशोभिकरण करण्यास उपलब्ध करून देणेबाबत तसेच उपलब्ध करून दिल्यास शहराच्या सौंदर्यात अजून भर पडेल व शहराच्या विकासाच्या दृष्टीने चांगल्या कामाला स्वखर्चाने मेडिटेशन सेंटर करणे व सुशोभिकरणाची परवानगी मिळणेबाबत पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

उक्त जागेवर मेडिटेशन सेंटरचे बांधकाम करणेबाबत UDCRP मधील तरतूद क्र.3.4.7 नुअर मंजूर अभिन्यासातील खुली जागेत 15% built up area allowed असल्याने प्रस्तावित बांधकाम हे UDCRP नुसार अनुज्ञेय आहे असा अभिप्राय नगररचना विभागाने दिला आहे.

तसेच उक्त मेडिटेशन सेंटर बांधणेसाठी पुण्यनगरी/मर्डर या वर्तमान पत्रात जाहीर हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. याबाबत नागरिकांच्या हरकती प्राप्त नाही उक्त बांधकाम स्वखर्चाने करणेस परवानगी देण्यासाठी मे.महासभेची मंजुरी घेणेकामी विषय महासभेपुढे सादर झालेला आहे.

सदर प्रस्ताव लक्षात घेता प्र.क्र.5 मध्ये येथे आनंद नगर येथील सर्व्हे नं.15/2 ओपन स्पेस येथे स्व खर्चातून मेडीटेशन सेंटर (ध्यान केंद्र) चे बांधकाम स्वखर्चाने संबंधित संस्थेमार्फत करण्यात येणार आहे. तथापी याबाबत सदर भागातील लेआऊट मधील भूखंड धारकांचे

लेखी संमतीपत्र घेण्यात यावे. तसेच संबंधीत भागातील सोसायटीचे नाहरकतपत्र व ठराव घेऊन पुनश्च सदर फेर प्रस्ताव सादर करावा तोपावेतो सदर विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१४५ प्र.क्र.5 मधील नकाणे रोड ते वाडीभोकर रोड या डी.पी.रस्त्यावर 5 ठिकाणी स्वखर्चातून चौक सुशोभिकरणाची परवानगी देणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता प्रभाग क्र.५ मधील नकाणे रोड ते वाडीभोकर हा १५ मीटर डीपी रस्ता आहे. त्यावर आपण डिव्हायडर टाकले आहे. त्या डिव्हायडरच्या बाजुला चिमणलाल प्रोव्हिजनसमोर संतकृपा अपार्टमेंटच्या पश्चिमेस चौक सुशोभिकरणाची विनंती केली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक तेथील नागरीकांची व वाहतुक शाखेची परवानगी लागेल.

उपअभियंता परवानगी घेतली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४५ दिनांक २३/०४/२०२५**

श्री.विशाल चंद्रकांत केले व सौ आरती अरुण पवार,माजी नगरसेविका ,मनपा धुळे यांनी धुळे शहरातील महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.5 मधील नकाणे रोड ते वाडीभोकर रोड हा 15 मी डी.पी.रस्त्यावर नकाणे रोड,चिमणलाल प्रोव्हिजन समोर डीव्हायडर जवळ,संत कृपा अपार्टमेंटच्या पश्चिमेस डीव्हायडर जवळ ,संतकृपा अपार्टमेंटच्या उत्तरेस डीव्हायडर जवळ पाटील नगर ऑक्सिजन पार्क डीव्हायडर जवळ,वाडीभोकर रोड करून गजानन महाराज मंदिराकडे जाणार्या मुख्य रस्त्यालगत या 5 ठिकाणी स्व.काकासो चंद्रकात केले मार्ग यास स्वखर्चाने चौक सुशोभीकरण परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. सोबत डिझाईन जोडण्यात आले आहे.

उक्त बाबत रस्त्यांपैकी जागेत कोणतेही नवीन बांधकाम प्रस्तावित करता येणार नाही. तसेच वाहतूक शाखेचा ना हरकत दाखला घेवून पुढील कार्यवाही करणे उचित राहील असा अभिप्राय नगररचना विभागाने दिलेला आहे.

डी.पी.रस्त्यावर वरील 5 ठिकाणी चौक सुशोभीकरण करण्यास ना हरकत प्रमाणपत्र मिळणेकामी वाहतूक शाखेस पत्र दिले असता म. पोलीस अधीक्षक, धुळे यांचेकडील क्र.जिवीशा/नाहरकत/दाखला/155/2025 दि.17/01/2025 अन्वये दिलेल्या नकाशाप्रमाणे सुशोभीकरण करण्यास सदर रोडवरून होणाऱ्या मोठ्या वाहनांच्या वाहतुकीस कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होणार नाही या अटीवर व शर्तीवर परवानगी देण्यास हरकत नाही असे कळविण्यात आले आहे.

उक्त चौक सुशोभीकरण करणेकामी आपला महाराष्ट्र व खानदेश खबर यान वर्तमान पत्रात जाहीर हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून एक हि हरकत आलेली नाही.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता प्र.क्र.5 मधील नकाणे रोड ते वाडीभोकर रोड या डी.पी.रस्त्यावर 5 ठिकाणी उक्त प्रस्तावात नमूद स्वखर्चातून श्री विशाल चंद्रकांत केले व सौ. आरती अरुण पवार माजी नगरसेविका मनपा धुळे यांना चौक सुशोभिकरणाची परवानगी

देणेस वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१४६ | पुण्य श्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेकामी फेर ठराव करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| मा.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले. |
| मा.उपअभियंता | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुर्णाकृती पुतळा संदर्भात सन २०२३ रोजी ठराव झाला होता. परंतु ठराव १ वर्षापेक्षा जुना असु नये अशी तरतुद आहे. सदरच्या कामासाठी फेरठराव होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सदरील विषय मे. महासभेपुढे सादर करण्यात आला आहे. |
| मा.आयुक्त तथा प्रशासक | सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. |

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४६ दिनांक २३/०४/२०२५**

पुण्य श्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पुतळा सध्यस्थितीत मनपा मालकीचे सरदार वल्लभभाई पटेल उद्यान (टॉवर बाग ) येथे आतलं बाजूस आहे. सदर पुतळा बागेतील आतील बाजूस असल्याने दुर्लक्षित आहे. सदर पुतळा व त्यांचे कार्य हे संपूर्ण समाजाला प्रेरणादायी व स्मरणीय असल्याने त्यांचे स्मारक तथा पूर्णाकृती पुतळा शहरातील दर्शनी भागात होणे आवश्यक आहे.

पुण्य श्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पूर्णाकृती पुतळा व भव्यदिव्य स्मारक धुळे शहरातील सुरत बायपास हनुमान टेकडी जलशुद्धीकरण केंद्राजवळ साक्री रोड येथील रस्त्याच्या मध्यवर्ती भागात उभारणे बाबत कळविले आहे.

उक्त बाबत सदरील प्रस्तावित जागा सार्वजनिक बांधकाम विभागा कडील रस्त्याच्या मध्यवर्ती भागात प्रस्तावित आहे. सदर कामास मंजुरी प्राप्त आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय क्र. पुतळा- 3116 / प्र.क्र. 308 / 29 दिनांक 2 मे, 2017 मधील अट क्र. 20 अन्वये पुतळा उभारणेसाठी पारित केलेला ठराव 01 वर्षा पेक्षा अधिक जुना असू नयेत अशी तरतूद समाविष्ठ करण्यात आलेली आहे. त्यानुसार उक्त विषयास 01 वर्षाचा कालावधी झालेला असल्याने फेर ठराव करणे आवश्यक असल्याने सदरचा विषय मे.महासभेकडे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता पुण्य श्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेकामी फेर ठराव करण्यास मंजूरी वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१४७ धुळे शहर मलनिस्सारण योजना टप्पा क्र .१ व २ ची कामे टप्पा क्र.२ मध्ये पुर्ण करून योजना कार्यान्वित करणे विषयी तांत्रिक बदलाचा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समितीचीकडेस (SLTC) मान्यतेसाठी सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.कार्य. अभियंता अमृत १ ची योजना महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांच्या अंतर्गत होत आहे. तसेच अमृत २ ची योजना मनपा अंतर्गत होत आहे. या योजनेअंतर्गत आपण २३.५ क्षमतेचा एक STP घेतलेला होता. ४० एमएलडी च्या बाजुला परंतु तांत्रिकदृष्टया बदल करणे आवश्यक होते. तसेच ते दोन ठिकाणी डिस्ट्रीब्युट झाल्याने कलेक्शन सिस्टिम पण प्रॉपर होणार होती. म्हणुन एका ठिकाणी १३.५ व एक १० एमएलडी असे दोन बायफरगेट केले. आणि तांत्रिक जो बदल झाला हा आपल्याला SLTC समोर ठेवण्याकरीता हा विषय मे. महासभेसमोर ठेवण्यात आला आहे. सदर बदल झाल्यामुळे साधारण २१.१० कोटीचे आर्थिक बजेट वाढणार आहे आणि त्याच्या मंजुरीस्तव SLTC पुढे पाठविणे आवश्यक आहे. त्याकरीता हा विषय मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक २३ एमएलडी कुठे पोपअप करणार त्याचा खर्च असेलच ना

कार्य. अभियंता हे सर्व कमी अधीक करुन नेटवर्क पणवाढले आहे. फिडरमेन आपल्याला टाकावी लागणार आहे. पांझरा नदीच्या दक्षीणेकडे त्याची कॉस्ट वाढली आहे. त्यामुळे किंमत वाढली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक तुम्हाला जुनी ट्रंकमेन यात करायची असेल तर यासाठीपण पैसे लागतील.

कार्य.अभियंता बाय ग्रॅव्हिटीने तो फलो येणार नाही पंपींग हाऊस मोती नाल्याच्या बाजुला बनेल आणि तेथुन पंप जोडुन ४० एमएलडी ला जोडले जाईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे प्रकरण सेक्रेटरींकडे पाठवायचे आहे यात फायदे तोटे टाकुन सर्व तपासुन द्यावे लागेल. हा प्रस्ताव जर या आठवडयात तयार करुन दिला तर बरे होईल. SLTC ला ठेवता येईल मान्यतेसाठी लवकरात लवकर हे करावे लागेल. यातली एक गोष्ट राहिली आहे कुमारनगरचा पुल आहे त्याच्या पलीकडुन येणारा नाला आहे.ज्यावर आपण बोलतोय. मोती नाल्यातील घाण पाणी जे डायरेक्ट नदीत जाणार आहे. पंपींग स्टेशन झाल्यामुळे नाल्यात येईल, दुषीत पाणी नदीत येणार नाही याची काळजी घ्यावी. तशीच स्थिती सुशीनाल्याबाबत राहिल. स्वच्छ भारत मिशनमध्ये पॅकेज STP साठी वेगळी प्रोव्हिजन आहे.

मा. उपायुक्त याबाबत मी विचारणा केली त्यांनी सांगीतले की तुमची लोकसंख्या १ लाखापेक्षा जास्त असलयामुळे SBM मधुन मिळणार नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक SBM मधुन मिळणार नसतील तर यातुन सजेस्ट करा. नदि प्रदुषीत करणारे नाले त्यांचे सोर्स आपल्याला बंद करता येईल. तेथे पॅकेज STP टाकता येत असेल तर पहा जेणेकरुन ट्रिटेड पाणी नदीत जाईल. अशी व्यवस्था करावी लागेल. नाहीतर दोनही ऑप्शन तपासुन पहा. हा प्रस्ताव पुढील आठवडयात मंत्रालयात जाईल असे पहा. सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४७ दिनांक २३/०४/२०२५**

अमृत २.० अंतर्गत धुळे शहर मलनिस्सा:रण (टप्पा क्र.२) योजनेस अनुक्रमे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली असून सदर योजना उभारणी कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मे.निसर्ग कन्सटन्सी , नाशिक या फर्मची नियुक्ती करणेत आलेली आहे. कार्यारंभ आदेशानुसार स्वीकृत निविदाधारक मे.जयंतीसुपर कन्स्ट्रक्शन प्रा.लि. ॲण्ड ऐन्वीराड प्रोजेक्टस प्रा.लि. (JV), मेहसाना (गुजरात) यांचेमार्फत योजनेची कामे प्रगतीत असून सर्वसाधारणपणे १०% योजनेची प्रगती झालेली आहे.

मे.निसर्ग कन्सटन्सी , नाशिक यांच्या कडील अभिप्रायानुसार , धुळे शहराची मलनिस्सा:रण योजना टप्पा क्र.१ व टप्पा क्र.२ अशा एकूण दोन टप्प्यांत विभागली गेली असून धुळे शहर मलनिस्सा:रण योजना टप्पा क्र.१ देखील प्रगतीपथावर आहे. सदर टप्पा क्र.१ योजनेचे कामाची प्रगती सर्वसाधारणपणे ७०% पुर्ण झाले असल्याचे समजते. या योजनेत पांझरा नदीच्या उत्तरेस एक १७ द.ल.ली. क्षमतेचे मलशुध्दीकरण केंद्र तसेच नदीच्या दक्षिणेस एक ४० द.ल.ली. क्षमतेचे मलजलशुध्दीकरण केंद्राचा समावेश आहे. ही दोन्ही मलजलशुध्दीकरण केंद्र पुर्णत्वास आलेली आहेत. यातील उत्तरेच्या १७ द.ल.ली. क्षमतेचे मलजलशुध्दीकरण केंद्र उर्वरीत कामे पुर्ण करणे व जोडणारी ट्रंकमेन पुर्ण करून कार्यान्विंत करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे. दक्षिण भागासाठी पुर्ण करण्यात आलेल्या ४० द.ल.ली. क्षमतेचे मलजलशुध्दीकरण केंद्र कार्यान्विंत करणेच्या दृष्टीने आवश्यक ट्रंकमेनेचे लांबी ५.९० कि.मी. असून सदरचे काम कंत्राटदाराने अद्याप केले नाही व टप्पा क्र.१ चे कंत्राटदार यांचे कडून ते काम होईल याची शाश्वती दिसून येत नाही.

निसर्ग कन्सलटन्सी, नाशिक , प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांच्या कडील अभिप्राया नुसार, स्वीकृत निविदेत उपांग क्र.२.अ.क्र.४६ बाब क्र.७ मध्ये खोदकामासाठी कठीण खडक अथवा काँक्रेट रस्ता हा यांत्रिकी पद्धतीने तोडणे (Excavation for Foundation in Hard Rock & Cement Concrete Road by Chiseling, Wedging, Line Drilling by Mechanical means) नमूद आहे. तथापि, सिमेंट काँक्रेट रस्त्यांमध्ये पाईपलाईन अंथरणेकामी सदर रस्ते ग्रूव्ह कटर मशीनने कट करणेची बाब निविदेत समाविष्ट नाहो. प्रत्यक्षात Mechanical means द्वारे काँक्रेट रस्ते खोदाई केल्यास रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर Vibrations (कंपन) निर्माण होतात त्यामुळे आवश्यक ठिकाणी ग्रूव्ह कटरने रस्ता कट करून त्यानंतर खोदाई करणे सुलभ होऊन काँक्रेट रस्त्यामध्ये आवश्यक तेवढ्याच रुंदीची खोदाई करणे शक्य होते परिणामी काँक्रेट रस्त्याची अनावश्यक खोदाई टाळता येते. उक्त बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाचे चालू दरसूचीनुसार व बाजारभावाप्रमाणे दर पृथ:करणानुसार मंजूर प्रकल्प अहवालात काँक्रेट रस्त्यांची लांबी विचारात घेऊन काँक्रेट रस्त्यांमध्ये पाईपलाईन अंथरणेकामी ग्रूव्ह कटर मशीनने कट करणेची रक्कम परिगणित केली असता ती सर्वसाधारणपणे वस्तू व सेवा करासहीत (Including GST) रु.५.०० कोटी इतकी येत असून सदर रक्कमेत प्रत्यक्ष साईटवर काम करतांना होणाऱ्या लांबीनुसार बदल होण्याची शक्यता संभवते त्यास स्थायी समितीची मान्यता प्राप्त आहे.

दि.२९/०१/२०२५ रोजी मा.आयुक्त धुळे म.न.पा. धुळे यांचे समवेत झालेली स्थळ पहाणीव प्रत्यक्ष चर्चाअंती टप्पा क्र.१ मधील कंत्राटदाराकडून राहिलेली ट्रंकमेन पुर्ण करण्याचे दृष्टीने तसेच टप्पा क्र.१ व टप्पा क्र.२ पुर्ण करून कार्यान्वित करण्याचे दृष्टीने वेगवेगळे पर्याय सादर करावेत अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत. सदरच्या सुचनानुसार या कार्यालयातर्फे सविस्तर मे.निसर्ग कन्सटन्सी , नाशिक यांच्या मार्फत सादर करणेत आलेला आहे. तद्नंतर मा.श्री.अनुप अग्रवाल , आमदार , धुळे शहर यांचे सोबत दि.१८/०२/२०२५ रोजी प्रत्यक्ष मलजलनिस्सारण योजनेच्या कामाची आढावा बैठक झाली. सदर बैठकीत दिलेल्या सुचनानुसार टप्पा क्र.१ व २ कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे तांत्रिक बदल प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१.धुळे शहर भुयारी गटार योजनेतील टप्पा क्र.१ मधील ४० द.ल.ली. मलजलशुध्दीकरण केंद्राकडे पोहचणारी ट्रंकमेन साधारणपणे ५.९० कि.मी. लांबी वगळता टप्पा क्र.१ मधील इतर सर्व कामे कंत्राटदारा मार्फत पुर्ण करणे प्रस्तावित आहे.

२.पांझरा नदीचे उत्तरेकडील भोकर, वलवाडी व नकाणे परिसरातील ऑऊट फॉल नं. ४ मधील १३.५ द.ल.ली. मलजल पांझरानदीच्या डाव्या किनाऱ्यालगत सुशी नाला संगमावरील पंपींग स्टेशन क्र.४ मध्ये एकत्र करून तेथून पुढे टप्पा क्र.२ मधील मंजूर योजनेप्रमाणे पंपींग मशिनरी व ८०० मि.मी. व्यासाच्या DI Pipe द्वारे ४० द.ल.ली. STP जवळील प्रस्तावित २३.५ द.ल.ली. STP मध्ये टाकणे ऐवजी उत्तरेकडील १७ द.ल.ली. क्षमतेच्या मलजलशुध्दीकरणाचे इनलेट चेंबर मध्ये टाकणे तसेच १७ द.ल.ली. मलजलशुध्दीकरण केंद्र पुर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यावर आवश्यकतेप्रमाणे १३.५ द.ल.ली. क्षमतेचे नविन मलजलशुध्दीकरण केंद्र बांधणे प्रस्तावित करणेत येत आहे.

३.टप्पा क्र.१ व २ मधील पांझरा नदीचे दक्षिणेकडील ऑऊट फॉल नं. २ मधून येणारे सांडपाणी मुख्यत: मोराणे (भाग), महिंदळे, चित्तोड व धुळे शहर भागातील सांडपाणी एकत्र करुन मोती नाल्यालगत पंपींग स्टेशन नं.३ मध्ये आणून ते ६०० मि.मी. व्यासाच्या (टप्पा क्र.१ ट्रंकमेन ऐवजी) DI Pipe उद्धरण नलिकेद्वारे ४० द.ल.ली. क्षमतेचे मलजलशुध्दीकरण केंद्राजवळ आणणे व ४० द.ल.ली. क्षमतेचे मलजलशुध्दीकरण केंद्र पुर्ण क्षमतेने कार्यांन्वित झाल्यावर आवश्यक ते प्रमाणे १० द.ल.ली. क्षमतेचे मलजलशुध्दीकरण केंद्र बांधणे प्रस्तावित करणेत येत आहे.

४. टप्पा क्र.२ मध्ये मंजूर असलेले पंपींग स्टेशन, पंपींग मशिनरी व २३.५० MLD मलजलशुध्दीकरण केंद्र इत्यादी उपांगे वगळणेत येत आहे.

५. वरील बदलामुळे गावातल्या काही Network System मध्ये काही बदल करावे लागत असून त्यामुळे १५० ते ११०० मि.मी. व्यासाचे आर.सी.सी. पाईप्स मध्ये सुमारे ३.०३५ कि.मी. लांबीची वाढ होत आहे. त्यानुसार सुधारित संकल्पन, आराखडे व अंदाजपत्रके तयार करणेत आलेली आहे.

६.वरील सर्व बदलामुळे योजनेच्या उपांगनिहाय खर्चात सर्वसाधारणपणे अतिरिक्त वाढ होत असल्या बाबत मे.निसर्ग कन्सटन्सी, नाशिक यांनी कळविले आहे.

त्याप्रमाणे योजनेत सर्वसाधारणपणे रु.२११०.२२ (१८% GST सह) वाढ होत असल्याचे दिसून येते. आजतागायत योजनेची भौतिक प्रगती १०% व आर्थिक प्रगती ५% इतकी कमी असल्याने आजमितिस संपुर्ण योजनेची संभाव्यबचत/ वाढ काढता येत नाही. योजनेचे साधारणत: ८०% काम पुर्ण झाल्यावर संभाव्य बचत/ वाढ काढणे शक्य होईल. प्राप्त परिस्थितीत दोन्ही योजना कार्यान्विंत करण्याचे दृष्टीने सदरच्या तांत्रिक बदलास शासनाची मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे. योजनेची कामे ८०% पर्यंत पुर्ण झाल्यावर पुनश्च:बचत/ वाढ तक्ता तयार करणेत येवून आवश्यकता भासल्यास सुधारित योजनेचा प्रस्ताव शासनास सादर करता येईल. सदर तांत्रिक बदलापुरता उपांगनिहाय बचत/ वाढ तक्ता प्रस्तावात नमूद केलेले आहे.

उक्त बाबत वरीलप्रमाणे योजनेत सर्वसाधारणपणे रु.२११०.२२ (१८% GST सह) वाढ होत असल्याने सदरील प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) कडे सादर करणे आवश्यक असल्याने सदरील विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता धुळे शहर मलनिस्सारण योजना टप्पा क्र .१ व २ ची कामे टप्पा क्र.२ मध्ये पुर्ण करून योजना कार्यान्वित करणे विषयी प्रस्तावात नमूद तांत्रिक

बदलाचा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक समिती कडेस (SLTC) मान्यतेसाठी सादर करणेस मंजूरी वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**